# बी.एस्सी.नर्सिंग (B.Sc.Nursing) पदवी अभ्यासक्रम

## प्रवेश प्रक्रिया २०२३-२४

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पर्यंत आरोग्य विज्ञान बी.एस्सी.नर्सिंग (B.Sc.Nursing) पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश हे नीट युजी या सामाईक प्रवेश परीक्षेच्या गुणवत्तेच्या आधारे करण्यात येत होते. परंतु शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये बी.एस्सी.नर्सिंग अभ्यासक्रम प्रवेशाबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद व मा.सर्वोच्च न्यायालय यांचेकडील आदेशाचे अनुषंगाने सदरील अभ्यासक्रमाचे प्रवेश हे १२ वी गुणवत्तेच्या आधारे करण्यात आलेले आहे.

तथापि शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता भारतीय उपचर्या परिषद, नवी दिल्ली यांचेकडील दिनांक ०६/०४/२०२३ रोजी प्रसिध्द अधिसुचनेनुसार सदर परीक्षा हि दिनांक १६ जुन २०२३ च्या आधी घेणे आवश्यक आहे व त्यानुषंगाने शासनाकडून प्राप्त निर्देशानुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील बी.एस्सी.नर्सिंग (B.Sc.Nursing) पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश हे राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाद्वारे घेण्यात येणाऱ्या स्वतंत्र सामाईक प्रवेश परीक्षेच्या गुणवत्तेच्या आधारे करण्यात येणार आहेत. सामाईक प्रवेश परीक्षेबाबतची अधिक माहिती वेळोवेळी राज्य सीईटी कक्षाचे **www.mahacet.org** या अधिकृत संकेतस्थळावर लवकरच उपलब्ध करुन देण्यात येईल.

याची सर्व संबंधित विद्यार्थी, पालक व शैक्षणिक संस्था यांनी नोंद घ्यावी.

**Commissioner**
**State CET CELL,**
**Maharashtra State, Mumbai.**